# <u>प्रेस रिलीज</u>

# एमपीजेचं सर्वसमावेशक विकासाच्या मुद्द्यावर  जळगाव मध्ये राष्ट्रीय अधिवेशन

मुंबई, महाराष्ट्र - मुव्हमेंट फ़ॉर पीस एंड जस्टिस फ़ॉर वेलफेयर (एमपीजे) भारतात सर्वसमावेशक विकासाच्या महत्वाबद्दल जागरूकता वाढविण्याकरिता आणि समाजातील सर्व वर्गांना विकासाच्या  प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्यासाठी  एका राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करत आहे.

अधिवेशनाचे उद्दिष्ट्य भारतात उपस्थित असणारी विषमता और वंचित समुदायांपुढे असणाऱ्या आव्हानांना प्रकाशझोतात आणणे, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक असमानतेला कमी करणे, उपेक्षित समूहांना आणि त्यातील लोकांना सक्षम करणे, टिकाऊ आणि पर्यावरणाला अनुकूल अश्या विकासाला प्रोत्साहन देणे, सामाजिक, आर्थिक और भौगोलिक भेदभाव दूर करणाऱ्या प्रयत्नांना समर्थन देणे, सर्वांना समान संधी आणि उपजीविकेचा अधिकार सुनिश्चित करण्यासाठी जागरूकता निर्माण करणे आणि वंचित समुदाय, जाती, धर्म आणि लैंगिक अल्पसंख्याकांच्या अधिकारांना आणि विकासाला प्रोत्साहन देणे आहे.

ही लक्षात घेण्याजोगी गोष्ट आहे की, आर्थिक विकास होऊनही जगातील बहुतांश गरीब लोक भारतात राहतात. त्यांची संख्या देशाच्या लोकसंख्येच्या निम्म्याहून अधिक आहे. मोठ्या संख्येने लोक दारिद्र्यरेषेखाली राहतात.आर्थिक भरभराट होण्याऐवजी, लोकसंख्येचा एक महत्त्वपूर्ण भाग आर्थिक अडचणींमुळे मूलभूत गरजा देखील पूर्ण करण्यासाठी संघर्ष करत आहे. परंतु त्याच वेळी काही लोक विश्वासापल्याड अफाट संपत्तीचे मालक बनले आहेत.त्यांची संपत्ती झपाट्याने वाढत आहे. गरीब अधिक गरीब होत आहेत आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. भारतात उपासमारीची स्थिती गंभीर आहे. आपल्या देशात बालकांच्या कुपोषणाचे, विशेषतः वेस्टिंगचे प्रमाण जगात सर्वाधिक आहे. देशातील बहुतांश लोकसंख्या दर्जेदार शिक्षण आणि आरोग्य सेवेपासून वंचित आहे. बेरोजगारीची आणि दारिद्र्याची समस्या अनियंत्रित आहे.

एमपीजे असं मानते की सर्वसमावेशक विकास हा भारताच्या विकासाचा  एक आवश्यक आधार आहे. जिथवर सर्वांसाठी समान संधी आणि  परिणाम सुनिश्चित नाही होत, तिथवर विकसित भारताचे स्वप्न साकार होणार नाही. एक विकसनशील आणि गरीबीने त्रस्त असलेला भारत ते विकसित आणि संपन्न भारत बनण्याचा प्रवास सर्वसमावेशक विकासाच्या धोरणांच्या अंमलबजावणी शिवाय शक्य नाही.संविधान सर्वसमावेशक विकास, मूठभर लोकांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण न होणे आणि सगळयांना जीवन जगताना प्रतिष्ठेचा अधिकार ह्यांना सुनिश्चित करण्याचे वचन देतं.ह्या संवैधानिक  आदर्श आणि वचनबद्धतेनंतरही देशातील बहुतांश लोकसंख्या

गरीबी आणि कुपोषणाला बळी पडली आहे.दर्जेदार शिक्षण आणि उत्तम आरोग्यव्यवस्थे पासून अजूनही हा समुदाय वंचित आहे.

म्हणून एमपीजे 11 फेब्रुवारी 2024 रोजी महाराष्ट्रातील जळगाव येथील छत्रपती संभाजी महाराज नाट्य संकुल येथे दुपारी 1 ते 5 या वेळेत सर्वसमावेशक विकासाचे घटनात्मक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, जनजागृती करण्यासाठी अधिवेशनाचे आयोजन करत आहे. या अधिवेशनाला देशभरातील विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरी समाजाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,ही अपेक्षा आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क:

आरिफ देशमुख, एमपीजे जळगाव जिल्हाध्यक्ष- 9075011884